नालेसफाईत एआयने शोधल्या त्रुटी

कंत्राटदारांना ९ कोटी २५ लाख ७२ हजार ८३० रुपयांचा दंड

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

मुंबईतील नालेसफाईबाबत मुंबईकर नाराज असताना कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीनेही या कामात अनेक त्रुटी शोधल्या आहेत. याबाबत आणि विलंबाबाबत मुंबई महापालिकेने कंत्राटदारांवर दंडात्मक कारवाई केली आहे. तब्बल ९ कोटी २५ लाख ७२ हजार ८३० रुपयांचा दंड ठोठावला आहे. ही रक्कम देयकांमधून वसूल करण्यात येणार आहे.

मुंबईत दरवर्षी पावसाचे प्रत्यक्ष आगमन होण्यापूर्वी महापालिकेच्या पर्जन्य जलवाहिन्या विभागाच्या माध्यमातून मुंबई महानगरातील मिठी नदी आणि मोठ्या नाल्यांमधून गाळ काढला जातो. तर, विभाग कार्यालयांच्या (वॉर्ड) पातळीवर लहान नाल्यांमधून गाळ काढण्याची कामे केली जातात. यंदा मार्चच्या पहिल्या आठवड्यात गाळ काढण्याची कामे सुरू करण्यात आली. या कामांवर प्रभावी देखरेखीसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (ए. आय) प्रणाली विकसित केली होती. तसेच छायाचित्रण समवेत ३० सेकंदाचे चित्रीकरण (व्हिडिओ) बंधनकारक केले आहे. तर लहान नाल्यांमधून गाळ काढण्यापूर्वीचे आणि नंतरचे सीसीटीव्हीद्वारे चित्रीकरण करणे अनिवार्य केले होते. प्राप्त सर्व व्हिडिओंचे पालिका प्रशासनाकडून कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीच्या मदतीने विश्लेषण करण्यात आले. यात अनेक ठिकाणी त्रुटी आढळल्या. त्यामुळे कंत्राटदारांवर दंडात्मक कारवाई प्रशासनाकडून केली आहे.

असा आकारला दंड

- मोठे नाले : १,३९,३९,३८०
- लहान नाले : ६,११,८६,९५०
- मिठी नदी : १,४८,५००

पुढारी | पाहिजेत (मुंबई)

ड्रायव्हर

अर्जदार एलएमव्ही लायसनधारक, सर्व प्रकारच्या गाड्या चालविण्याचा किमान २ वर्षांचा अनुभव. मुंबई व पुणे शहरांची पूर्ण माहिती असणाऱ्यास प्राधान्य. वयोमर्यादा २५ ते ४०. अनुभव व योग्यतेनुसार पगार दिला जाईल.

पात्र उमेदवारांनी खालील क्रमांकावर संपर्क साधावा
मो.क्र. : ८८०६७४७४४९

कार्यालय
पुढारी न्यूज
पुढारी भवन, सेक्टर ३०, सानपाडा, नवी मुंबई.

अनधिकृत बांधकामांना पुन्हा नोटिसा

नवी मुंबई पालिकेच्या विभाग कार्यालयात नियमितीकरणासाठी उद्यापासून सुनावणी

वाशी : पुढारी वार्ताहर

नवी मुंबईत गावठाण, झोपडपट्टी आणि सिडको नोडमध्ये गेल्या काही वर्षांत सुमारे १२ हजार अनधिकृत बांधकामे झाली आहेत. त्यांना महापालिकेकडून पुन्हा नोटिसा पाठवण्यात आल्या असून सोमवारपासून नियमितीकरणासाठी त्या-त्या विभाग कार्यालयात कागदपत्रांसह हजर राहण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

२०२४ मध्ये अनधिकृत बांधकामांबाबत सर्वोच्च न्यायालयामध्ये एक जनहित याचिका दाखल झाली होती. त्यामध्ये सर्व अनधिकृत बांधकामांवर कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार सर्व विभाग अधिकाऱ्यांनी गावठाण, झोपडपट्टी, सिडको नोड येथील अनधिकृत बांधकामधारकांना महापालिका निवडणुकीपूर्वी नोटिसा बजावण्यास प्रारंभ केला होता. मात्र निवडणुका व त्यानंतर जनगणना कामामुळे हे काम थांबले होते. आता पुढील आठवड्यात न्यायालयात सुनावणी लागण्याची शक्यता असल्याने आता उर्वरित सर्व नोटिसा बजावण्याचे काम पुन्हा वेगाने सुरू झाले आहे. एकूण १२ हजार जणांना या नोटिसा पाठवण्यात येणार आहेत.

या नोटिसांमध्ये म्हटले आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन आणि नगर रचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदीन्वये कायदेशीर कार्यवाहीस पात्र असल्याचे सकृत दर्शनी दिसून येते. त्या अनुषंगाने कागदपत्रे सादर करून सुनावणीसाठी उपस्थित राहण्यास सांगितले आहे. सदर सुनावणीसाठी प्रत्यक्ष उपस्थित न राहिल्यास अथवा कागदपत्रे सादर न केल्यास बांधकामधारकाचे कोणतेही म्हणणे नाही, याची नोंद घेऊन या प्रकरणी नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे नोटिसीमध्ये नमूद करण्यात आले आहे. शहरात एकाच वेळी एवढ्या मोठ्या प्रमाणात नोटिसा आल्याने रहिवाशांमध्ये खळबळ उडाली आहे.

वाढीव बांधकामांमुळे सुविधांवर ताण

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेच्या विकास अनुमतीशिवाय मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे करण्यात आली आहेत. यामुळे शहरातील पायाभूत सुविधांवर ताण वाढून या सुविधांचा बोजवारा उडायला लागला आहे. शहरातील अनेक भागांत जलवाहिन्यांद्वारे होणारा पाणीपुरवठा कमी पडू लागला आहे. २०३५ या वर्षापर्यंत पुरणाऱ्या मलनिःसारण वाहिन्या आतच भरून वाहू लागल्या आहेत. गावठाण, एल.आय.जी. झोपडपट्टी येथे १०० घरांच्या क्षमतेनुसार रस्ते, गटर, मीटर, उद्यान, मैदान आणि अन्य पायाभूत सुविधा देण्यात आल्या होत्या. तेथे ४०० ते ५०० घरे अनधिकृत बांधल्याने पायभूत सुविधांवर ताण आला आहे.

विरार-बोळींजच्या म्हाडा वसाहतीत तीव्र पाणीटंचाई

वसई-विरार महानगरपालिकेवर रहिवाशांचा मोर्चा

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

विरार-बोळींज येथे म्हाडाने उभारलेल्या ९ हजार ५०० घरांच्या प्रकल्पातील रहिवाशांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. पाणीपुरवठ्याच्या मागणीसाठी रहिवाशांनी वसई-विरार महानगरपालिकेवर मोर्चा काढला होता.

पुरेसे पाणी नसल्याने या प्रकल्पातील घरे वारंवार सोडतीत घेऊनही अर्जदारांचा प्रतिसाद मिळत नव्हता. त्यानंतर प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्त्वावर म्हाडाने ही घरे विकण्यासाठी सुरुवात केली. सध्या या वसाहतीत ६ हजार कुटुंबे राहात आहेत. कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने रहिवाशांचे हाल होत असल्याची माहिती रहिवासी कृष्णा देवाडिगा यांनी दिली. मोर्चानंतर रहिवाशांना केवळ पाणीपुरवठ्याचे आश्वासन मिळाले आहे. रात्री साडेबारा वाजता पाणी येते. दाब कमी असल्याने पुरेसे पाणी मिळत नाही. तसेच अनेकदा वीज पुरवठा खंडित होतो, अशा येथील रहिवाशांच्या तक्रारी असल्याची माहिती देवाडिगा यांनी दिली.

घरफोडीत ४.३८ लाखांचे दागिने चोरी

नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा

नालासोपारा पूर्वेकडील मोरेगाव परिसरात बंद घराचे कुलूप तोडून लॉकर फोडून सोन्याचे दागिने चोरी केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी तुळींज पोलीस ठाण्यात दोन अज्ञात इसमान विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ११ जून २०२६ रोजी दुपारी १ ते ३ या वेळेत ही चोरी झाली आहे.

बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

ठाणे विभागीय कार्यालय: बी-३७, वागळे औद्योगिक इस्टेट, ठाणे (प.)-४०० ६०४
दूर.०२२ २५८२९४०६, २५८२३०४०

शुद्धिपत्रक

कृपया १३.०३.२०२६ रोजी **"सार्वजनिक सूचना"** या मथळ्याखाली या वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या सूचनेचा संदर्भ घ्यावा. या सूचनेमध्ये (पाचपाखाडी शाखा स्थलांतर) शाखेच्या स्थलांतराची तारीख (प्रभावी दिनांक) **१५.०६.२०२६ वरून वाढवून २९.०६.२०२६ पर्यंत करण्यात आली आहे; तसेच लॉकर सेवाची तारीख २६.०६.२०२६ पर्यंत** करण्यात आली आहे. इतर तपशील मात्र पूर्वी प्रमाणेच राहतील.

प्रभारी अधिकारी,
बँक ऑफ महाराष्ट्र

नवी मुंबईत एका दिवसात १५८ किलो प्रतिबंधित प्लास्टिक जप्त

नवी मुंबई : पुढारी वार्ताहर

नवी मुंबई महापालिका प्रशासनाने शुक्रवारी आठही विभाग कार्यालयांच्या हद्दीत विशेष प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीम राबवून मोठी कारवाई केली. यात ३० व्यावसायिक व आस्थापनांवर कारवाई करीत त्यांच्याकडून एकूण १ लाख ५५ हजारांचा दंड वसूल करण्यात आला. सुमारे 158 किलो प्रतिबंधित प्लास्टिकचा साठा जप्त करण्यात आला आहे. कारवाईदरम्यान बेलापूर विभागात ३० हजार रुपयांचा दंड व १० किलो प्रतिबंधित प्लास्टिक, नेरूळ विभागात १० हजार रुपयांचा दंड व ५ किलो प्लास्टिक, वाशी विभागात ५ हजार रुपयांचा दंड व ५ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. तुर्भे विभागात सर्वाधिक कारवाई करत ८ व्यावसायिक व आस्थापनांकडून ४५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला तसेच तब्बल १०० किलो प्रतिबंधित प्लास्टिक जप्त करण्यात आले. याशिवाय कोपरखैरणे विभागातून २० हजार रुपयांचा दंड व २ किलो, घणसोली विभागातून ३० हजार रुपयांचा दंड व २८ किलो, तर ऐरोली विभागातून १५ हजार रुपयांचा दंड व ८ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले.

नामफलकांवरील नोटिसांविरोधात नवी मुंबईतील व्यापारी आक्रमक

नेरूळ : पुढारी वार्ताहर

नवी मुंबई महानगरपालिकेकडून शहरातील व्यापाऱ्यांना दुकानांवरील नामफलक आणि ग्लो-साईन बोर्डसंदर्भात नोटिसा बजावण्यात येत असल्याच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई व्यापारी महासंघाची तातडीची बैठक गुरुवारी बेलापूर येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस शहरातील विविध भागांतील असंख्य व्यापारी उपस्थित होते. यावेळी नवी मुंबई व्यापारी महासंघाचे अध्यक्ष प्रमोद जोशी यांनी सांगितले की, मनपा अधिकारी व्यापाऱ्यांना दूरध्वनीद्वारे संपर्क साधून परवाना प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी दबाव टाकत आहेत. नामफलकाला जाहिरात फलक ठरवून त्यावर परवाना शुल्क, दंडात्मक कारवाई आणि विविध जाचक अटी लादल्या जात असून सदर बाब व्यापारीवर्गावर अन्याय करणारी आहे. बैठकीत उपस्थित व्यापाऱ्यांनी महानगरपालिकेच्या एकतर्फी भूमिकेबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली असून व्यापारी महासंघाने या विषयावर कायदेशीर लढा देण्याचा निर्धार व्यक्त केला. तसेच व्यापाऱ्यांवर कोणतीही दंडात्मक कारवाई करण्यापूर्वी महानगरपालिकेने व्यापारी संघटनांशी चर्चा करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

पुनर्विकास इमारतीतील फ्लॅट खरेदीदारांना दीड कोटीचा गंडा

मुलुंड : पुढारी वार्ताहर

मुलुंड पश्चिम येथील पुनर्विकास प्रकल्पामध्ये फ्लॅट विक्रीच्या नावाखाली १ कोटी ४९ लाख ७८ हजार रुपयांची फसवणूक झाल्याचा आरोप करत काही खरेदीदारांनी संबंधित बिल्डरविरोधात पोलिसांकडे धाव घेतली होती. मुलुंड पोलिसांनी लायझर बिल्डर्स अँड डेव्हलपर्सचे मालक प्रदीप भिमशी निशार व संबंधितांवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. सुनील गांधी (६२) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, येथील 'लायझर एलीगंस' या प्रकल्पातील फ्लॅट खरेदीसाठी त्यांनी टप्प्याटप्प्याने ५४ लाख ४३ हजार रुपये भरले. त्यात बँक व्यवहार, स्टॅम्प ड्युटी व टीडीएसचा समावेश आहे. याच प्रकल्पात गांधी यांच्या नातेवाइकांनीही फ्लॅट खरेदी केले. १८ नोव्हेंबर २०२४ रोजी पंचशील एसआरए गृहनिर्माण संस्थेकडून आलेल्या पत्रात लायझर बिल्डर्स अँड डेव्हलपर्स यांना विकासक म्हणून अपात्र ठरविण्यात आल्याची माहिती देण्यात आली. बिल्डरकडे वारंवार पाठपुरावा केला असता, सुरुवातीला सोसायटीशी चर्चा सुरू असल्याचे सांगण्यात आले. नंतर विकासकपद रद्द झाल्याने पैसे परत करण्यात येतील, असे आश्वासन देण्यात आले. मात्र ना फ्लॅट मिळाला ना पैसे.

जीवघेण्या गर्भधारणेतून सुखरूप सुटका; मातृत्वही अबाधित

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

वाडिया रुग्णालयातील डॉक्टरांनी अत्यंत दुर्मीळ आणि जीवघेण्या सर्व्हायकल एक्टोपिक गर्भधारणेवर यशस्वी उपचार करून २८ वर्षीय महिलेचे प्राण वाचवले. विशेष म्हणजे उपचारांमुळे तिची भविष्यातील मातृत्व क्षमतादेखील सुरक्षित राहिली आहे. गर्भधारणेच्या सहाव्या आठवड्यात ही समस्या निदर्शनास आली. तपासणीत गर्भाच्या ठिकाणी रक्तपुरवठा खूप जास्त असल्याचे आढळले. त्यामुळे थेट गर्भ काढल्यास जीवघेणा रक्तस्राव होण्याची शक्यता होती. डॉ. पायल लखानी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथम गर्भाची वाढ थांबविण्यासाठी मेथोट्रेक्सेट औषध देण्यात आले. त्यानंतर डॉ. गिरीश वर्सवडेकर यांच्या पथकाने एम्बोलायझेशन तंत्राचा वापर करून गर्भाला रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्या बंद केल्या. त्यामुळे रक्तस्रावाचा धोका कमी झाला आणि सुरक्षितपणे गर्भ काढण्याची प्रक्रिया पार पडली. वाडिया रुग्णालयाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मिनी बोधनवाला यांनी सांगितले की, वेळीच निदान, तज्ज्ञ डॉक्टरांचा समन्वय आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे हे यश शक्य झाले.

सर्व्हायकल एक्टोपिक गर्भधारणा

सर्व्हायकल एक्टोपिक गर्भधारणा ही १० ते १५ हजार गर्भधारणांमागे एका प्रकरणात आढळणारी दुर्मीळ अवस्था आहे. यामध्ये गर्भाची वाढ गर्भाशयाऐवजी गर्भाशयाच्या मुखात (सर्व्हिक्स) होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात रक्तस्राव होऊन जीवाला धोका निर्माण होऊ शकतो.

संक्षिप्त

मालवणीत उघड्या गटारामुळे अपघाताची भीती; नागरिक संतप्त

मालाड : पुढारी प्रतिनिधी

मालवणीतील गावदेवी मंदिर रस्त्यावरील गटाराचे झाकण खचल्याने परिसरात दुर्घटनेची भीती निर्माण झाली आहे. या घटनेनंतर पालिकेच्या पी उत्तर विभागाने दुरुस्तीच्या नावाखाली तात्पुरती मलमपट्टी केली होती. मात्र अवघ्या काही दिवसांतच हे झाकण पुन्हा तुटून पडले आहे. ११ जून रोजी दुपारी चारच्या सुमारास विटा वाहून नेणाऱ्या एका ट्रकचे चाक या उघड्या गटारात अडकल्याने अपघात घडला होता. सुदैवाने जीवितहानी टळली, मात्र ट्रक बाहेर काढण्यासाठी क्रेन बोलवावी लागली. या घटनेमुळे काही तास वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. याशिवाय अनेक दुचाकीस्वारांचे किरकोळ अपघातही या ठिकाणी घडले आहेत. यात वाहनांचे नुकसान झाले आहे. सुदैवाने कोणालाही गंभीर दुखापत झालेली नाही. दरम्यान, मान्सून तोंडावर आल्याने उघड्या गटारांमुळे लहान मुले व वाहनधारकांसाठी दुर्घटनेचा धोका वाढल्याची भीती स्थानिक नागरिक व्यक्त करीत आहेत. नागरिकांनी पालिका प्रशासनाने तातडीने कायमस्वरूपी दुरुस्ती करून संभाव्य दुर्घटना टाळावी, अशी मागणी केली आहे.

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

TENDER NOTICE

Tenders are invited for Procurement of LT XLPE Al Armoured Cables of size 3.5 C X 50 sq.mm & 3.5 C X 35 sq.mm. with Estimated Cost of Rs. 682.07 Lakhs against MSEDCL advertised Tender on website vide no. MMD/T-LTM-10/0626 due for submission on dtd. 02.07.2026. For details please visit website: https://etender.mahadiscom.in/eatApp/

HO PR 142/26 **Chief Engineer (MMD)**

SBI | स्टेट बँक ऑफ इंडिया

अधिकृत अधिकाऱ्यांची माहिती: – मोबाईल क्रमांक ९८९२८३४४६०
लँडलाइन क्रमांक (कार्यालय):-०२२-४१६११४१७ सीओ मोबाईल क्रमांक: ९८२२४७२८५०

शाखा – स्ट्रेड ॲसेटस मॅनेजमेंट ब्रांच-II
रहेजा चेंबर्स, तळमजला, विंग बी, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-४०००२१
दूर क्र. ०२२-४१६११४२३, ई-मेल आयडी : team4.15859@sbi.co.in

परिशिष्ट-IV-ए (नियम ८(६) ची परंतुके पहा) स्थावर मिळकतींच्या विक्रीकरिता विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शियल असेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ऍक्ट, २००२ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) च्या तरतुदीनुसार स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-निविदा विक्री सूचना.

याद्वारे सर्वांना सूचित करण्यात येते की, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता, जी सुरक्षित धनको (स्टेट बँक ऑफ इंडिया) कडे गहाण ठेवलेली आहे, ज्याची भौतिक ताबा अधिकृत अधिकारी, स्टेट बँक ऑफ इंडिया यांनी घेतला आहे, ती ''जे आहे जेथे आहे'' ''जे आहे जसे आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे'' याच स्थितीत ०२.०७.२०२६ रोजी विक्री केली जाईल. बँकेच्या बाकी वसुलीसाठी (सरफैसी ॲक्ट, २००२ अंतर्गत) गहाण ठेवलेल्या मालमत्तेची ई-निविदा निर्दिष्ट शर्तींवर आयोजित केली जाईल.

कर्जदाराचे नाव	जामीनदाराचे नाव	ज्या मालमत्तेची विक्री केली जात आहे/करण्यात येत आहे त्यांच्या वसुलीसाठी थकबाकी
मेसर्स सॉलिटेअर टेक्सफेब अँड ट्रेडर्स प्रायव्हेट लिमिटेड ६०५, बिझेस क्लासिक, चिंचोली बंदर रोड, मालाड (पश्चिम), मुंबई-४०००६४.	**वैयक्तिक जामीनदार** १. श्री. रिंकू इंद्रकुमार पटोदिया, २. सुश्री अनिता रिंकू पटोदिया, **कॉर्पोरेट जामीनदार** १. मेसर्स गीता गोपाल सिंथेटिक्स प्रा. लि.	०४.११.२०१२ रोजी रु. १३,७४,५५,६७३.१५ (रुपये तेरा कोटी चौहत्तर लाख पंचावन्न हजार सहाशे त्रेहत्तर पैसे फक्त पंधरा) पुढील व्याज आणि खर्चासह आणि ०४.११.२०१२ पासूनचा खर्च (जर काही असेल तर रोख वसुली कमी करा) **मागणी सूचना तारीख: – ०५.११.२०१२**

जमालमत्ता कराराधारकांची नावे	मालमत्तेचे वर्णन	ई-लिलावाची तारीख आणि वेळ	राखीव किंमत आणि ईएमडी तपशील	मालमत्तेची तपासणीची तारीख आणि वेळ
मेसर्स गीता गोपाल सिंथेटिक्स प्रायव्हेट लिमिटेड (मेसर्स सॉलिटेअर टेक्सफेब अँड ट्रेडर्स प्रायव्हेट लिमिटेडला कॉर्पोरेट गॅरंटर)	युनिट क्रमांक ६०१, सहावा मजला, 'ए' विंग, सोलारिस-१ प्रिमाइसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड, एल अँड टी गेट क्रमांक ६ समोर, साकी-विहार रोड, पवई, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००७२, मेसर्स गीता गोपाल सिंथेटिक प्रायव्हेट लिमिटेड यांच्या मालकीचे. **(सोसायटीच्या देखभालीसाठी ४६,४५,०८०.०० रुपये देय)**	**तारीख :- ०२.०७.२०२६ वेळ : सकाळी ११:०० ते दुपारी ०४.०० पर्यंत, प्रत्येकी १० मिनिटांच्या अमर्यादित मुदतवाढीसह.**	**राखीव किंमत रु. १.२९ कोटी याच्या खाली मालमत्ता विकली जाणार नाही** **इसारा अनामत रक्कम (इअर): राखीव किमतीच्या १०%, म्हणजे रू. १२,९०,०००/-** **बोली वाढीची रक्कम रू. १०,०००**	**२२.०६.२०२६, सकाळी ११:०० ते दुपारी ४:००**

***लक्ष द्या :** याची नोंद घ्यावी की, सदर ई-लिलाव हा ''जे आहे जेथे आहे'' ''जे आहे जसे आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे'' तत्वावर घेण्यात येण्यात आहे.

१. कार्यालय क्रमांक ६०२, ६०३ आणि ६०४ हे मेसर्स पाल ट्रेडिंग कंपनी प्रायव्हेट लिमिटेड या खात्यात गहाण ठेवले आहेत. आम्ही ही ३ कार्यालये एकाच लॉटमध्ये ठेवत आहोत. ज्याचा लिलाव **दिनांक ०२.०७.२०२६** रोजी ०.९७ कोटी रुपयांना १.३१ कोटी रुपयांना आणि ०.७५ कोटी रुपयांना अनुक्रमे **१४.०६.२०२६** रोजी पुढारी दैनिकात प्रकाशित झालेल्या स्वतंत्र ई-लिलाव सूचनासह ठेवण्यात आला आहे.
२. कार्यालय क्रमांक ६०१ हे सॉलिटेअर टेक्सफेब अँड ट्रेडर्स प्रायव्हेट लिमिटेड या खात्यात गहाण ठेवण्यात आले आहे.
३. कार्यालय क्रमांक ६०१, ६०२, ६०३ आणि ६०४ हे आतून विलीन केले आहेत. चारही कार्यालये संयुक्त आधारावर विकली जातील. बोलीदार चार कार्यालयांसाठी वैयक्तिकरित्या नव्हे तर एकत्रितपणे बोली लावावी लागेल.
४. आम्हाला सोलारिस-१ प्रिमाइसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेडने दिनांक ११.११.२०२५ क्रमांक ११/२०२५/१८ रोजी जारी केलेली **४६,४५,०८०.००** रुपयांची मागणी सूचना प्राप्त झाली आहे. अधिकृत अधिकाऱ्याला इतर कोणताही भार माहित नाही. तथापि, इच्छुक बोली लावणाऱ्याने संबंधित कार्यालये / सरकारी विभागांकडून मालमत्तेवरील भाराबाबत स्वतः चौकशी करावी आणि योग्य ती तपासणी करावी. कोणत्याही प्राधिकरणाकडे किंवा कोणाकडेही देय असलेले सर्व वैधानिक / गैर-वैधानिक देयके, सोसायटी देखभाल देयके, महावितरण देयके आणि मालमत्ता कर, दर, मूल्यांकन, शुल्क, शुल्क इत्यादींचे देयक केवळ यशस्वी बोलीदाराचीच असेल.

यशस्वी बोली लावणाऱ्याने विक्री किमतीच्या उर्वरित २५% रक्कम, आधीच भरलेल्या ईएमडीचे समायोजन केल्यानंतर, ताबडतोब, म्हणजे त्याच दिवशी किंवा पुढील कामकाजाच्या दिवसाच्या आत, जसे असेल तसे, अधिकृत अधिकाऱ्याने ऑफर स्वीकारल्यानंतर जमा करावी, असे न केल्यास बयाणा रक्कम जमा करावी लागेल. बोलीदाराने जमा केलेली रक्कम जप्त केली जाईल. विक्री किमतीच्या उर्वरित ७५% रक्कम सुरक्षित मालमत्तेच्या विक्रीची पुष्टी झाल्यापासून १५ व्या दिवशी किंवा त्यापूर्वी किंवा सुरक्षित धनको आणि ई-लिलाव खरेदीदार यांच्यात लेखी मान्य केलेल्या वाढीव कालावधीत ई-लिलावाच्या तारखेपासून तीन महिन्यांपेक्षा जास्त नसावी, देय असेल.

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, कृपया स्टेट बँक ऑफ इंडिया, सुरक्षित धनकोच्या वेबसाइट्स: **https://sbi.bank.in** आणि पीएसबी अलायन्सच्या ई-लिलाव साइट **https://baanknet.com** वर दिलेल्या लिंकचा संदर्भ घ्या.

बँकेची वेबसाइट https://sbi.bank.in		ई-लिलाव वेबसाइट https://baanknet.com	
मालमत्ता आयडी क्रमांक	मालमत्तेचे स्थान:	मालमत्तेचे व्हिडिओ / फोटो	मालमत्तेचा यूएसपी
SBIN1000002064219			

सरफेसी कायद्यांतर्गत १५ दिवसांची वैधानिक विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८ (६) च्या परंतुकानुसार आवश्यकतेनुसार, कर्जदार/जामीनदारांना **दिनांक ०४.०६.२०२६** रोजीची नोटीस देण्यात आली आहे.

दिनांक : १४.०६.२०२६ **सही/-**
ठिकाण : मुंबई **प्राधिकृत अधिकारी, स्टेट बँक ऑफ इंडिया**

SBI | स्टेट बँक ऑफ इंडिया

अधिकृत अधिकाऱ्यांची माहिती: – मोबाईल क्रमांक ९८९२८३४४६०
लँडलाइन क्रमांक (कार्यालय):-०२२-४१६११४१७ सीओ मोबाईल क्रमांक: ९८२२४७२८५०

शाखा – स्ट्रेड ॲसेटस मॅनेजमेंट ब्रांच-II
रहेजा चेंबर्स, तळमजला, विंग बी, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-४०००२१
दूर क्र. ०२२-४१६११४१७, ई-मेल आयडी : team4.15859@sbi.co.in

परिशिष्ट-IV-ए (नियम ८(६) ची परंतुके पहा) स्थावर मिळकतींच्या विक्रीकरिता विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शियल असेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ऍक्ट, २००२ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) च्या तरतुदीनुसार स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-निविदा विक्री सूचना.

याद्वारे सर्वांना सूचित करण्यात येते की, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता, जी सुरक्षित धनको (स्टेट बँक ऑफ इंडिया) कडे गहाण ठेवलेली आहे, ज्याची भौतिक ताबा अधिकृत अधिकारी, स्टेट बँक ऑफ इंडिया यांनी घेतला आहे, ती ''जे आहे जेथे आहे'' ''जे आहे जसे आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे'' याच स्थितीत ०२.०७.२०२६ रोजी विक्री केली जाईल. बँकेच्या बाकी वसुलीसाठी (सरफैसी ॲक्ट, २००२ अंतर्गत) गहाण ठेवलेल्या मालमत्तेची ई-निविदा निर्दिष्ट शर्तींवर आयोजित केली जाईल.

कर्जदाराचे नाव	जामीनदाराचे नाव	ज्या मालमत्तेची विक्री केली जात आहे/करण्यात येत आहे त्यांच्या वसुलीसाठी थकबाकी
पाल ट्रेडिंग कंपनी प्रायव्हेट लिमिटेड ६०५, बिझेस क्लासिक, चिंचोली बंदर रोड, मालाड (पश्चिम), मुंबई-४०००६४.	**वैयक्तिक जामीनदार** १. श्री. रिंकू इंद्रकुमार पटोदिया, २. सुश्री अनिता रिंकू पटोदिया, **कॉर्पोरेट जामीनदार** १. मेसर्स गीता गोपाल सिंथेटिक्स प्रा. लि.	**१०.०६.२०१३ रोजीची रक्कम रु. २६,६५,७५,८१८.८३** (रुपये सव्वीस कोटी पासष्ट लाख पंच्याहत्तर हजार आठशे अठरा आणि त्र्याऐंशी पैसे फक्त), **तसेच १०.०६.२०१३** पासून पुढील व्याज, खर्च आणि शुल्क (असल्यास रोख वसुली वजा करून). **मागणी सूचना दिनांक: ०२.०७.२०१३**

जमालमत्ता कराराधारकांची नावे	मालमत्तेचे वर्णन	ई-लिलावाची तारीख आणि वेळ	राखीव किंमत आणि ईएमडी तपशील	मालमत्तेची तपासणीची तारीख आणि वेळ
मेसर्स गीता गोपाल सिंथेटिक्स प्रायव्हेट लिमिटेड (मेसर्स पाल ट्रेडिंग कंपनी प्रायव्हेट लिमिटेडला कॉर्पोरेट गॅरंटर)	युनिट क्रमांक ६०२, सहावा मजला, 'ए' विंग, सोलारिस-१ प्रिमाइसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड, एल अँड टी गेट क्रमांक ६ समोर, साकी-विहार रोड, पवई, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००७२, मेसर्स गीता गोपाल सिंथेटिक प्रायव्हेट लिमिटेड यांच्या मालकीचे. **(सोसायटीच्या देखभालीसाठी २७,७३,८८३.०० रुपये देय)**	**तारीख :- ०२.०७.२०२६ वेळ : सकाळी ११:०० ते दुपारी ०४.०० पर्यंत, प्रत्येकी १० मिनिटांच्या अमर्यादित मुदतवाढीसह.**	**राखीव किंमत रु. ०.९७ कोटी याच्या खाली मालमत्ता विकली जाणार नाही** **इसारा अनामत रक्कम (इअर): राखीव किमतीच्या १०%, म्हणजे रू. ९,७०,०००/-** **बोली वाढीची रक्कम रू. १०,०००**	**२२.०६.२०२६, सकाळी ११:०० ते दुपारी ४:००**
मेसर्स गीता गोपाल सिंथेटिक्स प्रायव्हेट लिमिटेड (मेसर्स पाल ट्रेडिंग कंपनी प्रायव्हेट लिमिटेडला कॉर्पोरेट गॅरंटर)	युनिट क्रमांक ६०३, सहावा मजला, 'ए' विंग, सोलारिस-१ प्रिमाइसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड, एल अँड टी गेट क्रमांक ६ समोर, साकी-विहार रोड, पवई, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००७२, मेसर्स गीता गोपाल सिंथेटिक प्रायव्हेट लिमिटेड यांच्या मालकीचे. **(सोसायटीच्या देखभालीसाठी ३६,०९,१५५.०० रुपये देय)**	**तारीख :- ०२.०७.२०२६ वेळ : सकाळी ११:०० ते दुपारी ०४.०० पर्यंत, प्रत्येकी १० मिनिटांच्या अमर्यादित मुदतवाढीसह.**	**राखीव किंमत रु. १.३१ कोटी याच्या खाली मालमत्ता विकली जाणार नाही** **इसारा अनामत रक्कम (इअर): राखीव किमतीच्या १०%, म्हणजे रू. १३,१०,०००/-** **बोली वाढीची रक्कम रू. १०,०००**	**२२.०६.२०२६, सकाळी ११:०० ते दुपारी ४:००**
मेसर्स गीता गोपाल सिंथेटिक्स प्रायव्हेट लिमिटेड (मेसर्स पाल ट्रेडिंग कंपनी प्रायव्हेट लिमिटेडला कॉर्पोरेट गॅरंटर)	युनिट क्रमांक ६०४, सहावा मजला, 'ए' विंग, सोलारिस-१ प्रिमाइसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड, एल अँड टी गेट क्रमांक ६ समोर, साकी-विहार रोड, पवई, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००७२, मेसर्स गीता गोपाल सिंथेटिक प्रायव्हेट लिमिटेड यांच्या मालकीचे. **(सोसायटीच्या देखभालीसाठी २२,५३,१७०.०० रुपये देय)**	**तारीख :- ०२.०७.२०२६ वेळ : सकाळी ११:०० ते दुपारी ०४.०० पर्यंत, प्रत्येकी १० मिनिटांच्या अमर्यादित म